प्रकरण चौथे

# भारत-अमेरिका अणु कराराचा भारतीय राजकारणावरील परिणाम

# प्रकरण चौथे

## भारत-अमेरिका अणु कराराचा भारतीय राजकारणावरील परिणाम

ऑक्टोबर 2004 मध्ये सत्तेवर आलेल्या डॉ. मनमोहन सिंग सरकारने अमेरिकेबरोबर नागरी अणुसहकार्य करार करण्याची घोषणा केली. तसेच हा करार पूर्णत्वाला नेण्याच्या उद्‌देशांनी पावलेही उचलली. या कराराने भारतीय राजकारण ढवळून निघाले. प्रस्तुत प्रकरणात भारत- अमेरिका नागरी अणुसहकार्य कराराचा भारतीय राजकारणावर कसा परिणाम झाला/पडला याविषयी विवेचन करीत आहे.

18 जुलै 2005 ला या कराराची घोषणा झाली. त्याचबरोबर भारतात या कराराविषयी चर्चा आणि मतप्रदर्शनाला सुरवात झाली.

भारतात सध्या आघाडी सरकारचा प्रयोग सुरू आहे. या आघाडीत असणारा महत्वाचा घटकपक्ष म्हणजे कम्युनिस्ट पक्षाची डावी आघाडी आणि विरोध पक्ष असणारी भारतीय जनता पार्टी आणि त्याची राष्ट्रीय लोकशाही आघाडीने या कराराला विरोध केला.

कराराला जोरदार विरोध केला तो डाव्या आघाडीने त्यांनी हा विरोध करताना करारातील अनेक गोष्टीवर भर दिला. त्याचा मुख्य विरोध हाईड कायद्याला होता. हा विरोध नोंदविताना मा.क.प चे प्रकाश करात भा.क.प चे ए.बी.वर्धन, अखिल भारतीय फॉरवर्ड ब्लॉकचे जी.देवराजन व क्रांतीकारी समाजवादी पक्षाचे अवनी रॉय यांनी 7 ऑगस्ट 2007 रोजी एक निवेदन

प्रसिद्ध केले. त्यात ते म्हणतात, "भारत- अमेरिका यांच्या दरम्यान होऊ घातलेला आण्विक करार भारताला जखडून टाकणा ऱ्या सर्वकष व्यूहात्मक गुफणीचा भाग आहे. तसेच भारताचे स्वतंत्र परराष्ट्र धोरण, भारताची व्यूहात्मक स्वायत्तता आणि भारताला आशिया खंडातील आपला हमखास विश्वसनीय साथीदार बनविण्याची अमेरिकेची धडपड या मुद्यावर कराराचे संभाव्य परिणाम काय होतील याचा गांभीर्यपूर्वक सखोल विचार केल्या वाचून हा करार करू नये. असा आकमक पवित्रा घेतला."[1] या निवेदनात डाव्याचा मुख्य विरोध हाईड कायद्याला आहे. या कायद्याच्या "104 ग (2) ई (1) या कलमात भारताचे परराष्ट्रीय धोरण अमेरिकेच्या परराष्ट्रनीतीशी तंतोतंत एकरूप असावे ही शर्त आहे, तसेच 104 (ग) (2) के मध्ये अमेरिकेच्या 'अण्वस्त्रप्रसार प्रतिबंधक सुरक्षा पुढाकार' या वादग्रस्त योजनेला व आंतरराष्ट्रीय महासागरात अन्य देशीय नौकांना अटकाव करण्याच्या पराकोटीच्या बेकायदा तरतुदींना मान्यता दिल्याची घोषणा करून तिच्या अंमलबजावणीत भारताने भागिदारी करणेची शर्त आणि कलम 104 क.ई.एफ.जी. मध्ये नमूद केल्याप्रमाणे 'अमेरिकन क्षेपणास्त्र प्रबंधक व्यवस्था' (MTCR) ऑस्ट्रेलियन ग्रुप करार इ. आज भारताने सही न केलेल्या वेगवेगळया द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय करारांशी भारताने सहमती करून त्यानुसार वर्तन करणेची शर्त आहे."[2]

असे डाव्या आघाडीचे हाईड कायद्याबद्दल मुख्य आक्षेप आहेत. त्यामुळे हा करार करू नये अशी जोरदार मागणी डाव्या आघाडीने केली.

यादरम्यान मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिट ब्यूरोने 14 ऑगस्ट 2007 रोजी भारत-अमेरिका आण्विक करार कार्यान्वित करू नका असा स्पष्ट इशारा देणारे निवेदन प्रसिद्ध केले यात त्यांनी भारताच्या संरक्षण आणि परराष्ट्र धोरणावर येणाऱ्या बंधनावर विशेष भर दिला. यांनंतर लगेचच माकपच्या पॉलिट ब्यूरोची बैठक नवी दिल्लीत 17 व 18 ऑगस्ट 2007 रोजी झाली. त्यात त्यांनी एक ठराव संमत केला. त्यात ते म्हणतात, "या कराराचा विचार अमेरिकन संसदेने संमत केलेल्या हाईड कायदयाच्या अनुषंगाने केला पाहिजे. तसेच या कराराने भारत हा अमेरिकेच्या व्यूहात्मक भागिदारीत घट्ट जखडला जावून देशाच्या स्वतंत्र परराष्ट्रीय धोरणावर, सार्वभौमत्वावर आणि जनतेच्या आर्थिक हितसंबंधावर त्याचे घातक परिणाम होणार आहेत. पॉलिट ब्यूरोचे हे ठाम मत आहे की, या कराराचा पाठपुरावा करण्याने भारताचे हित साधले जाणार नाही."[3] अशा आशयाचा ठराव मंजूर केला. हाईड कायद्याच्या परिणामांचे मूल्यमापन केल्याशिवाय आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संघटनेशी संरक्षक कराराच्या दिशेने वाटाघाटी करण्याचे पुढचे पाऊल टाकता काम नये. असा इशारा दिला. यामुळे सरकार आणि डाव्या अघाडीत असणाऱ्या मतभेदावर तसेच डाव्या पक्षांनी व्यक्त केलेल्या प्रश्नावर अध्ययन करण्यासाठी केंद्र सरकारने 4 सप्टेंबर 2007 रोजी 15 सदस्यांची अणुकरार समिती स्थापन केली. परराष्ट्र मंत्री प्रणव मुखर्जी या समितीचे निमंत्रक आहेत. या समितीत कॉंग्रेसचे सहा सदस्य आहेत. त्यात "श्री. प्रणव मुखर्जी, संरक्षण मंत्री ए.के.ॲटनी, अर्थमंत्री पी. चिदंबरम, विज्ञान

तंत्रज्ञान मंत्री कपिल सिब्बल, जलसंपत्ती मंत्री सैफुद्दीन सोझ, पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, यांचा समावेश आहे. डाव्या आघाडीतील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ए.बी.वर्धन, डी.राजा, फॉरवर्ड ब्लॉकचे देवव्रत विश्वास, क्रांतिकारी समाजवादी पक्षाचे टी.जे.चंद्रचूदन यांचा समावेश आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष व केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार, राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष रेल्वेमंत्री लालूप्रसाद यादव आणि द्रमुकचे सदस्य व केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री टी.आर.बालू इत्यादीचा या समितीत समावेश आहे. या समितीचा अहवाल मिळेपर्यंत केंद्राने आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाशी कोणतीही चर्चा करू नये. अशी मागणी मा. प्रकाश करात यांनी केली."[4]

ही समिती स्थापन झाल्यानंतर 5 सप्टेबर 2007 रोजी लोकसभेत अणुकराराच्या मूल्यमापनासाठी संयुक्त संसदीय समिती स्थापन करण्याची भारतीय जनता पक्षाने मागणी केली. ही मागणी सरकारने स्पष्टपणे फेटाळली. ही मागणी फेटाळल्यामुळे विरोधी पक्ष गोंधळ करणार हे स्पष्ट झाल्यामुळे लोकसभेचे अधिवेशन ही वेळेआधी आटोपत घेतले. सभागृहात अणु करारावर समाधानकारक चर्चाही होवू शकली नाही. यावेळी श्री. लालकृष्ण अडवाणी यांनी भारतीय जनता पार्टीची भूमिका स्पष्ट केली. अडवाणी म्हणाले, "आपल्याकडे ऊर्जास्त्रोतांची कमी आहे आणि आपली गरज वाढते आहे यात काहीच शंका नाही. अणुऊर्जा आपल्या गरजपूर्तीला हातभारही लावेल. पण 25 वर्षांनी ती ही केवळ 3-4 टक्केची वाढ होईल. तरीही अणुऊर्जाला आमचा

विरोध नाही तसेच तंत्रज्ञानालाही नाही. पण तोच राष्ट्रासमोर एकमेव पर्याय आहे आणि लोकांच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे असे काही नाही. या कराराला आमचा विरोध आहे मात्र हा विरोध डाव्या पक्षापेक्षा वेगळा आहे. त्यांचा विरोध या करारासह अमेरिकेशी असलेल्या आंतरराष्ट्रीय संबंधाना आहे. आमचा विरोध फक्त कराराला आहे. या कराराने आण्विक स्वायत्ताच धोक्यात येणार असेल तर का मोजायची ही किंमत, तसेच आमचा हाईड कायद्याला ही विरोध आहे. अमेरिकेशी राजनैतिक आणि सामरिक संबंधांना भाजपाचा विरोध नाही."[5]

22 सप्टेंबर 2007 रोजी डाव्या आघाडीची भूमिका थोडी मवाळ झाल्याचे दिसून आले. कोलकत्ता येथे जेष्ठ मार्क्सवादी नेते ज्योती बसू यांनी कराराला पाठिंबा देत म्हणाले, "अणुऊर्जा मिळविण्यासाठीच अमेरिकेबरोबर करार झाला आहे. देशात आणि राज्यात नव्या उद्योगांची वाढ होत असताना ऊर्जेची मागणीही वाढणार आहे. ही वाढती गरज भागविण्यासाठी देशाला अणुऊर्जेची आणि अणुप्रकल्पांची गरज आहे."[6] श्री. जी ज्योती बसू याच्या निवेदनामुळे डाव्यात मतभेद असल्याची शंका येण्यास सुरवात झाली. कारण पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री बुध्ददेव भटटाचार्य यांनीही अणुकराराला पाठिंबा जाहिर केला होता. पण हा सूर लगेचच बंद होऊन डाव्या आघाडीने आपला विरोध तीव्र केला. याच काळात 6 ऑक्टोंबर 2007 रोजी पंतप्रधानाच्या 7 रेसकोर्स या निवासस्थानी सायंकाळी झालेल्या इफतार समारंभाच्या वेळी सरकारबाबत काळजी

वाटते काय? असे पत्रकारांनी विचारले असता श्रीमती सोनिया गांधी म्हणाल्या, "काळजी कसली करायची, निवडणूका झाल्यातर आम्ही जोमाने लढू" या त्यांच्या वक्तव्यावरून चर्चा वेग धरत असतानाच 7 ऑक्टोंबरला हरियाणाच्या झज्जर जिल्हयातील झाडली गावामध्ये इंदिरा गांधी सुपर थर्मल पॉवर प्रकल्पाच्या भूमीपूजन समारंभाच्या वेळी बोलताना श्रीमती गांधी यांनी "अणु सहकार्य कराराला विरोध करणारे देशाच्या विकासाचे शत्रू आहेत" अशी डाव्या पक्षावर अप्रत्यक्ष टीका केली. सर्वसाधारण समोपचाराची भाषा वापरणाऱ्या सोनिया गांधी यांनी हे आक्रमक विधान करीत डाव्यांना सरकारचा पाठिंबा काढून घेण्याचे अप्रत्यक्षपणे आव्हानच दिले. डॉ. मनमोहन सिंग सरकारला बाहेरून समर्थन देत असलेल्या डाव्या आघाडीने भारत-अमेरिका अणुसहकार्य करारावर तीव्र आक्षेप घेत हा करार कार्यान्वित केल्यास सरकारचा पाठिंबा काढून घेण्यात येईल असा अनेकदा इशारा दिला होता. त्यामुळे डाव्यांच्या शंका व आक्षेपांचे निराकरण करण्यासाठी युपीए आणि डाव्या आघाडीची 15 सदस्यीय विशेष समिती ही स्थापन करण्यात आली आहे. पण या समितीच्या बैठकीतील चर्चेमुळे आजपर्यंत उभय आघाडयांच्या भूमिकेत कोणताही बदल झालेला नाही. त्या पार्श्वभूमीवर श्रीमती गांधी यांचे हे वक्तव्य महत्त्वपूर्ण होते. याच काळात दिल्लीमध्ये अस्थिरता निर्माण झाली होती. पण 12 सप्टेंबर 2007 रोजी श्रीमती. सोनिया गांधी म्हणाल्या, "सरकारला अणुकरारावरून डाव्याशी संघर्ष करायचा नाही. कारण असा संघर्ष करणे आघाडी सरकारचा धर्म असू

शकत नाही."[6] तर डॉ. मनमोहन सिंग यांनी "भारत-अमेरिका अणुकरार प्रश्नी अपयश येणे म्हणजे सारे काही संपणे नव्हे, आमचे सरकार एका मुद्दयावर चालत नाही, सरकार उर्वरित दीड वर्षाचा कार्यकाळ निश्‍चितपणे पूर्ण करेल"[7] असे विधान केल्यामुळे मुदत पूर्व निवडणुकीच्या चर्चेस किमान या वेळेस तरी पूर्णविराम मिळाला. पण डावी आघाडी आणि सरकार यांच्यातील संघर्ष कमी झाला नाही. संघर्ष असा चालू असतानाच करात यांनी भूमिका मवाळ केल्याचे दिसून आले. 12 नोव्हेंबर 2007 रोजी माकपचे सरचिटणीस श्री. प्रकाश करात म्हणाले, "अणुकराराबाबत आम्ही ताठर नाही या कराराच्या निमित्ताने निर्माण झालेला पेच सोडविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आणि त्याला यश येऊन करार मार्गी लागेल" पण करात यांची ही भूमिका फार काळ टिकली नाही. यानंतर थोडयाच काळात 'फॉरवर्ड ब्लॉक' ने पाठिंबा काढून घेण्याचा इशार दिला. तसेच ज्योती बसुनीही आपली भूमिका बदलताना म्हणाले, 'भारत-अमेरिका अणुकराराच्या मुद्दयावर आमची भूमिका मवाळ झालेली नाही. बदललेली तर मुळीच नाही. आपला पक्ष कोणतीही तडजोड करणार नाही.' यावरून डाव्यांनी आपला विरोध तीव्र करीत जाणवू लागले. डाव्यांनी हा अधिकच तीव्र केला. 17 जून 2008 रोजी प्रकाश करात यांनी "भारत- अमेरिका अणुकरार नकोच परंतू आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाची भारतलक्षी देखरेख आणि सुरक्षा उपाययोजना करार करता कामा नये. असे सरकारला बजावले." सरकारला ऊर्जाटंचाईची समस्या महत्त्वाची वाटत असल्यास इराण-पाकिस्तान-भारत

वायूवाहिणीचा प्रकल्प लवकर मार्गी का लावत नाही असा उलट प्रश्न केला. याचवेळी सरकारशी संबंधाचा फेरविचार करा. देशाची अर्थव्यवस्था चुकीच्या दिशेने नेणाऱ्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारशी संबंध ठेवण्यासंबंधी डाव्या पक्षांनी फेरविचार करावा असे आव्हान भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जेष्ठ नेत गुरूदास गुप्ता यांनी केले. यानंतर डाव्या पक्षांनी अणुसुरक्षा कराराची प्रत मिळावी अशी मागणी केली. या सुरक्षा कराराचा अभ्यास करून आम्ही त्या कराराबद्दल भूमिका मांडू अशी भूमिका डाव्या पक्षांनी संयुक्त बैठकीनंतर 18 जून 2008 रोजी घेतली.

डाव्यांच्या विरोधाला न जुमानता आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाबरोबर भारताच्या अणुसुरक्षाविषयक पुढील पाऊल उचलण्याचे सरकारने ठरविल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला. डाव्या आघाडीने करार थांबवा अन्यथा पाठिंबा काढू अशी स्पष्ट धमकीच सरकारला दिली. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल आणि द्रमुकने सरकारच्या पाठीशी राहण्याचा निर्णय जाहिर केला. यावेळी समाजवादी पार्टी कराराच्या विरोधात होती. तर लोकजनशक्ती पक्षाचे श्री. रामविलास पासवान यांनी कोणताच निर्णय घेतला नव्हता. 19 जूनला माकपचे पॉलिट ब्यूरो सदस्य सिताराम येचूरी यांनी स्पष्टपणे सरकारला निर्वाणीचा इशारा दिला. "तुमच्याकडे 25 जून पर्यंत वेळ आहे. तोपर्यंत सरकारने कराराबाबत विचार करावा. सरकार जर या कराराला मार्गस्थ करण्याच्या प्रयत्नात असेल किंवा सरकारने असा निर्णय घेतला तर

आमचा निर्णय पक्का आहे. आम्ही या सरकारचा पाठिंबा काढणार आहोत. हे सरकार अणुकरारावर कुर्बान करण्यास तयार आहोत." यामुळे कॉंग्रेसने संयुक्त पुरोगामी आघाडीतील घटक पक्षांना अणुकराराच्या बाजूनी एकत्र करण्याची कसरत सुरू केली.

कॉंग्रेसची कराराच्या बाजूने घटकक्षांना एकत्र करण्याची जोरदार कसरत सुरू असताना संयुक्त पुरोगामी सरकारला बाहेरून पाठिंबा देणा ऱ्या बहूजन समाजपक्षाच्या अध्यक्षा मायावती यांनी सरकारचा पाठिंबा काढून घेतला. या पक्षाचे 17 खासदार आहेत. पाठिंबा काढून घेताना अणुकराराचा मुद्दा उपस्थित न करता "केंद्रसरकारला महागाई नियंत्रणात आणण्यात अपयश आले आहे, ताज कॉरीडोर प्रकरणात आपल्याला अकारण त्रास दिला तसेच उत्तर प्रदेशला केंद्र सरकारने नेहमीच दुय्यम दर्जाची वागणूक दिली." असे आरोप करीत केंद्रसरकारचा पाठिंबा काढून घेतला. दरम्यान आघाडीतील घटकपक्षांनी या परिस्थितीत निवडणूका नकोत ही वेळ निवडणूकांची नाही. असे स्पष्ट मत आघाडीच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांच्याकडे व्यक्त केले. या पार्श्वभूमीवर सरकार वाचविण्याचे प्रयत्न म्हणून कृषीमंत्री शरद पवार, रेल्वे मंत्री लालूप्रसाद यादव, पोलाद मंत्री रामविलास पासवान, परिवहन मंत्री टी. आर. बालू यांची श्रीमती. सोनिया गांधी यांनी स्वतंत्र भेट घेवून अणुकरारावर स्वतंत्र चर्चा केली. अणुकरारावरील कोंडी फोडण्यासाठी गेली काही दिवस सुरू असलेल्या सल्लामसलतीची सुत्रे परराष्ट्र मंत्री प्रणव मुखर्जी यांच्याकडे होती. परंतु 22 जून

2008 रोजी प्रथमच श्रीमती सोनिया गांधी हस्तक्षेप करून स्वतःच घटकपक्षाची मते जाणून घेतली. यावेळी सर्वच नेत्यांनी अणुकरार हा देशहिताचा असला तरी त्याबाबत डाव्यांच्या शंकांचे निरसण करण्याची आवश्यकता व्यक्त केली. सध्याची वेळ निवडणूकांना योग्य नाही. आणि महागाई, पूर यासारख्या समस्येतून जनतेची सोडवणूक करण्यास प्राधान्य द्यावयाला हवे हेही स्पष्ट केले.

25 जून 2008 रोजी संयुक्त पुरोगामी आघाडीची अणुकराराविषयीच्या बैठकीत कोणताच निर्णय झाला नाही. या बैठकीत अणुकराराला मूर्त स्वरूप देण्यावर कॉंग्रेस पक्ष ठाम राहील. तर डाव्या आघाडीने कराराला कसून विरोध केला. पण करारावर पुढे जाण्यासाठी उत्सुक असलेल्या युपीए सरकारने डाव्या आघाडीच्या मागण्या फेटाळून लावल्या आणि आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संघटनेशी करावयाच्या कराराचा मसुदा दाखविण्याची श्री. प्रकाश करात करात यांची मागणी सरकारने अमान्य केली. तसेच आयईएशी करार केल्यानंतर सरकार अणुइंधन पुरवठादार गटाशी वाटाघाटी करणार नाही. तसेच अमेरिकेशी 123 करार करणार नाही. याची हमी देण्यासही युपीए सरकारने नकार दिला. युपीए सरकारकडे प्रथमच डाव्या आघाडीने अशी मागणी केली. पण डाव्या आघाडीला त्यातील फोलपणा लक्षात आला.

29 जून 2008 रोजी डाव्यांनी आपला विरोध तीव्र करीत अणुकरार पुढे रेटण्याचा प्रयत्न केल्यास आम्ही पाठिंबा काढून घेऊ असा स्पष्ट इशार दिला. हा तणाव वाढत असतानाच पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग 30 जून रोजी

यावर भाष्य करताना म्हणाले, "अमेरिकेबरोबरच्या नागरी अणुऊर्जा करारासाठी आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सी आणि अणुइंधन पुरवठादार देशांच्या गटाबरोबर (एनएसजी) चर्चा करण्यास सरकारला परवानगी दिल्यास या कराराची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यापूर्वी सरकार संसदेसमोर कराराचा संपुर्ण तपशील जाहिर करून त्यास संसदेची मान्यता घेईल." पण या स्पष्टीकरणानंतरही डावे आपल्या मतावर ठाम राहिले. उलट सरकारचे प्रतिनिधी ज्याक्षणी चर्चेसाठी अमेरिकेला जातील त्याक्षणी आम्ही सरकारचा पाठिंबा आम्ही काढून घेवू असा पुन्हा इशारा दिला. डाव्यांच्या या इशाऱ्याची पंतप्रधानांनी खिल्ली उडविली. व त्यांच्या या धमक्यात नवे काहीही नाही. असे स्पष्ट केले.

तणाव वाढत असतानाच महाराष्ट्रतील प्रादेशिक पक्ष असणाऱ्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी अणुकरारात शिवसेना महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे पुन्हा स्पष्ट केले. आपला मित्रपक्ष असणाऱ्या भाजपची या करारासंदर्भातील भूमिका सरकारच्या विरोधात असली तरी, भाजपच्या विरोधाची फिकीर न करता शिवसेना सरकारच्या बाजूने उभी राहील असे स्पष्ट केले.पण शिवसेनेच्या भूमिकेबाबत राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू असतानाच शिवसेनेचे कार्याध्यक्ष उध्दव ठाकरे यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट करताना म्हणाले, "अणुकराराच्या प्रश्नावर शिवसेना, राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सोबतच आहे. या प्रश्नावर एनडीएची भूमिका आहे तीच शिवसेनेची आहे त्यामुळे

आमच्या भूमिकेबाबत कोणही गैरसमज करून घेवू नयेत." या स्पष्टीकरणामुळे शिवसेनेची भूमिका स्पष्ट झाली.

याच दिवशी श्री. प्रकाश करात यांनी पाठिंबा काढून घेण्याबाबत 4 जुलै रोजी निर्णय घेण्यात येईल असे स्पष्ट केले. दरम्यान तिस ऱ्या आघाडीतील महत्वाचा घटकपक्ष असणारी समाजवादी पार्टीच्या नेत्यांनी माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्याबरोबर चर्चा करून अणुकराराला पाठिंबा घेतला.

पंतप्रधान जी-8 देशाच्या शिखर परिषदेला निघाले असताना विमानात पत्रकार परिषदेत "अणुसहकार्य करारावर भारत लवकरच आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेकडे जाणार असल्याचे निसंदिग्धपणे स्पष्ट केले." त्यामुळे डाव्या आघाडीकडे पाठिंबा काढून घेण्याशिवाय कोणताच पर्याय उरला नसल्याचे सांगितले. यामुळे तणाव वाढला. श्री. प्रकाश करात यांनी 8 जूलै 2008 रोजी पाठिंबा काढून घेण्याची घोषणा केली. दिल्लीत राजकीय घडामोडी वेगवान घडत असतानाच समाजवादी पक्षाने बैठक घेवून संसदेत सरकारला पूर्ण पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. यामुळे दिल्लीत वातावरण तापले. सरकार वाचविण्यासाठी व पाडण्यासाठी संसद सदस्यांची सौदेबाजी सुरू झाली. डाव्या आघाडीने पाठिंबा काढल्यामुळे भारतीय जनता पक्षाने विश्वासदर्शक ठरावाची मागणी केली. या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर सरकारने आयएईए बरोबर गोपनीय

कराराचा मसुदा जाहिर केला. ज्यात 'भारताच्या आण्विक, लष्करी धोरणात हस्तक्षेप करणार नसल्याचे स्पष्ट हमी देण्यात आली.'

दरम्यान 13 जूलै रोजी अणुकराराच्या मुद्दयावरून मनमोहन सिंग सरकारला शह देण्यासाठी आज माकमचे सरचिटणीस श्री. प्रकाश करात यांनी उत्तरप्रदेशाच्या मुख्यमंत्री मायावती यांची भेट घेवून सरकार पाडण्यासंबंधी मतैक्य घडवून आणले. वातावरण इतके तापत असतानाच आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सीच्या 35 सदस्य देशासोबत पूर्वी ठरल्यानुसार 18 जूलै 2008 रोजी बैठक होणार असल्याचे भारताने स्पष्ट केले. भारताने 7 जुलै रोजी आयएईएकडे कराराचा मसुदा पाठविल्यानंतर ही बैठक बोलावण्यात आली. 35 सदस्यीय देशांच्या आयएईए गव्हर्नर मंडळात अणुइंधन पुरवठादार समुहातील 26 देशांचा समावेश आहे.

अंतर्गत राजकारणात कमालीची अस्थिरता असूनही भारताने अणुकराराच्या प्रक्रियेत खंड पडू दिला नाही. 22 जूलैला शक्ती परीक्षेसाठी जोरदार रस्सीखेच सुरू असतानासुध्दा लोकसभेतील लहानपक्ष अपक्ष यांनी आपली भूमिका उघड केली नाही. दुसरीकडे विविध गुन्हयाखाली तुरूंगात असणाऱ्या संसद सदस्यांना मतदानासाठी तुरूंगातून बाहेर काढण्यासाठी कॉंग्रेसच्या प्रयत्नावर नंतर डाव्या आघाडीनी नैतिकतेचे टिकास्त्र सोडले. आणि भाजपशी सरकार पाडण्यासाठी सरकार पाडण्यासाठी मैत्री करणार असल्याचे स्पष्ट केले. कॉंग्रेसने वेगवान हालचाली करत झारखंड मुक्तीमोर्चा (पाच खासदार), राष्ट्रीय

लोकदल (तीन खासदार), नॅशनल कॉन्फरन्स (तीन खासदार), जनता दल धर्मनिरपेक्ष (तीन खासदार), अशा पक्षांचा पाठिंबा मिळवण्यासाठी सरकारने जोरदार प्रयत्न केले. तापलेल्या वातावरणात भर टाकत सरकार कोसळल्यास बसपा नेत्या मायावती यांना पंतप्रधान पदासाठी पाठिंबा दिला जाईल असे प्रतिपादन भाकप नेते ए.बी.वर्धन यांनी केल्यामुळे खळबळ उडाली. विश्वास ठराव जसा जवळ येईल तसे खासदार फुटण्याचे प्रमाण वाढले. या अस्थिर वातावरणात 22 जूलै 2008 रोजी लोकसभेचे खास अधिवेशन सुरू झाले. 22 जूलै रोजी लोकसभेत जोरदार चर्चा सुरू झाली. पण 23 तारखेला भाजपचे 3 संसद सदस्यांना तटस्थ राहण्यासाठी सत्तापक्षाने लाच दिल्याचे सांगत अध्यक्षांच्या हौदात नोटांच्या बॅगा उघडून दाखविल्यानंतर संसदेत प्रचंड गोंधळ सुरू झाला. दोषींवर कडक कारवाई करणार असल्याची घोषणा अध्यक्षाने केल्यानंतर सायंकाळी मतदान झाले. विश्वास प्रस्तावाच्या बाजूने 275 तर विरोधात 256 मते पडली. 541 सदस्य असलेल्या लोकसभेत सरकारने 19 मतांनी विश्वास प्रस्ताव जिंकला. या विश्वास प्रस्तावाच्या निमीत्ताने संसद सदस्य लाचप्रकरण, पक्ष आदेश (पार्टीव्हीप) धुडकाविणे विश्वास प्रस्तावाच्या वेळी अनुपस्थिती, इत्यादी गोष्टी घडल्या. त्यामुळे भारतीय लोकशाहीतील दोष प्रकर्षाने पुढे आले.

भारताच्या संसदीय लोकशाहीच्या इतिहासात आंतरराष्ट्रीय प्रश्नावरून सरकारला अविश्वास ठरावाला सामोरे जाण्याची ही पहिलीच घटना होती. हया अविश्वास प्रस्तावावर मतदान करण्यासाठी जे अधिवेशन बोलाविले गेले त्यात

अशा अनेक गोष्टी घडल्या ज्यामुळे भारताच्या संसदीय इतिहासाला काळे फासले गेले.

संसदेत प्रश्न विचारण्यासाठी खासदारांना लाच दिल्याचे प्रकरण ताजे असतानाच अविश्वास प्रस्तावावर मतदान करतेवेळी तटस्थ राहण्यासाठी सत्ताधारी पक्षाकडून लाच दिल्याचा आरोप करीत अध्यक्षांच्या असनासमोरील हौदात नोटांची बॅग उघडली. अशी घटना देशाच्या लोकशाहीच्या इतिहासातील पहिलीच घटना घडली. त्यामुळे संसद सदस्यही आवाक झाले. या कथित लाच प्रकरणाचे स्टिंग ऑपरेशन करणा ऱ्या सीएनएन आयबीएन वृत्त वाहिनीने या प्रकरणाशी संबंधीत टेप लोकसभा अध्यक्ष सोमनाथ चटर्जी यांना देण्याचे जाहिर केल्याने या प्रकरणात अधिक सत्यता दिसून येत आहे. यामुळे भारतातील राजकीय पक्ष सत्ता टिकवण्यासाठी किंवा पाडण्यासाठी प्रत्ययच आला.

दुसरी महत्वाची घटना म्हणजे काही संसद सदस्यांनी उघड-उघड पक्षाच्या विरोधात भूमिका घेतली. तर काही मतदानाच्या वेळी अनुपस्थितीत राहिले. तर काही तटस्थ राहिले. संसद सदस्य अनुपस्थितीत राहाणे किंवा तटस्थ राहणे हे त्यांनी केवळ राजकीय स्वार्थासाठी केलेले कृत्य आहे. सरकार पाडण्याच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या व्यूहरचनेला सुरूंग लावणारे अनेक होते. त्यात 'सोमाभाई पठेल (निलंबित गुजरात)', बाबूभाई कटारा, बृजभूषण शरणसिंग, चंद्रभानसिंग (मध्यप्रदेश), हरिभाऊ राठोड (महाराष्ट्र), मजूनाथ (कर्नाटक) आणि संगलिया (बंगळूर), या सर्वांनी पक्षादेश धुडकावून

सरकारच्या बाजूने मतदान केले. तर उडपीच्या महिला संसद सदस्य 'मनोरमा मध्वराज' या चर्चा सुरू असताना सभागृहात हजर होत्या. नंतर मात्र मतदानाच्या वेळी गायब झाल्या. तसेच महाराष्ट्रातील शिवसेनेचे संसद सदस्य तुकाराम रेंगं-पाटील मतदानाच्या वेळी सभागृहात गैरहजर राहिले. तेलगू देसमच्या औदिकेश्वल (चित्तूर) आणि एम.जगन्नाथ (नगर कुर्नूल) यांनीही सरकारच्या बाजूने मतदान केले. या गोष्टी जाणूनबुजून राजकीय किंवा अन्य स्वार्थासाठी केल्याचे उघड आहे. असेच विविध गुन्हयाखाली तुरूंगात असणा ऱ्या संसद सदस्यांना बाहेर काढण्याचे प्रयत्न कॉँग्रेसने केले त्यामुळे सरकार टिकविण्यासाठी किंवा पाडण्यासाठी ज्या मार्गाचा वापर केला गेला ते मार्ग नक्कीच अयोग्य होते. यामुळे भारतीय लोकशाहीचा इतिहास कलंकित झाला.

या अधिवेशनात लोकसभेच्या सभापतीपदी असणारे मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षाचे नेते श्री. सोमनाथ चटर्जी जे संसदेचे 37 वर्षे सदस्य राहिले आहेत त्यांची पक्षाने पक्षातून हकालपट्टी केली. कारण म्हणजे सभापतीपदाचा राजिनामा देण्याचा आदेश देवूनही त्यांनी तो झुगारला होता. मुख्य म्हणजे त्यांचे पद पक्षीय राजकारणापेक्षा मोठे आहे. तरीही पक्षाने जी भूमिका घेतली, ती लोकशाही परंपरांना धरून नाही. हा एक चुकीचा पायंडा पडण्याची भिती आहे.

सरकारवर डाव्या आघाडीचे बरेच नियंत्रण होते. डाव्या पक्षाच्या दबावातून मुक्त झाल्याने संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकाला आर्थिक

सुधारणांना वेग देईल असे अर्थमंत्री पी. चिदंबरम. यांनी सांगितले. यावरून आघाडी सरकारवर सरकार टिकवण्यासाठी अनेक गोष्टींना मुरड घालावी लागते. त्याचा प्रत्यय येतो. तसेच केंद्रातील सरकार अस्थिर असताना शेअर बाजारातही घसरण होत राहिली. विश्वास प्रस्ताव जिंकल्यावर 838 अशांनी शेअर बाजार वाढला. यामुळे अस्थिर सरकारचा तोटा किती व्यापक आहे हे दिसून येतो.

तसेच काही पक्ष राजकीय स्वार्थासाठी अणूऊर्जा कराराला धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून आले. या प्रयत्नाला उत्तर प्रदेशातील एक महत्त्वाची मुस्लिम संघटना 'जमात-ए-उलेमा हिंद'ने विरोध केला. "अणुकरार हा धार्मिक मुध्दा नसून मतांच्या राजकारणासाठी मुस्लिम समाजाला वेठीस धरण्याचा प्रयत्न करू नये."[8] असे स्पष्ट प्रतिपादन केले आहे.

मार्क्सवादी कमुनिस्ट पक्षाचे नेते एम.के.पंथ यांनी हा करार 'मुस्लिमविरोधी' असल्याचे म्हंटले होते. समाजवादी पक्षाने या कराराच्या मुद्यावर युपीए सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्यावर उत्तरप्रदेशाच्या मुख्यमंत्री मायावती यांनीही हा करार मुस्लिम विरोधी असल्याचे प्रतिपादन केले. त्यानंतर राज्यातील काही मुस्लिम धर्मगुरूंनी मायावती यांची भेट घेवून त्या भूमिकेबद्दल त्याचे अभिनंदन केले होते. भारतातील कोणताही राजकीय पक्ष आपल्या राजकीय स्वार्थासाठी देशहिताचा विचार न करता धार्मिक आधार घेवून समाजात अराजकता निर्माण करतात हा भारतीय लोकशाही व्यवस्थेतील महत्वाचा दोष प्रकर्षाने पुढे आला. त्यामुळे जातीयता, धार्मिकता, जमातवाद

भारतीय राजकारणात वाढत असून हया समस्या भारतीय लोकशाहीच्या विकासातील अडथळे बनल्या. आहेत.

भारतात गेल्या चार वर्षात देशातील अनेक राज्यात शेतक-यांचे आत्महत्यांचे अखंड सत्र चालू आहे. महाराष्ट्रात हा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. केंद्र आणि राज्यसरकारच्या अनेक योजना यावर परिणामकारक उपाय करू शकल्या नाहीत. भारतात महागाई 11 टक्क्यांवर पोहचली आहे. सामान्य जनता महागाईमुळे होरपळून निघत आहे. राजकीय पक्षांना शेतक-यांच्या आत्महत्या महागाई यासारख्या प्रश्नावर केंद्रसरकारचा पाठिंबा काढावा वा अविश्वास ठराव आणावा असे एकाही पक्षाला वाटले नाही. फक्त राजकीय स्वार्थासाठी अणुकराराचे कारण साधून सरकारवर विश्वास ठराव आणून आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न संधीसाधू राजकीय पक्ष करीत आहेत. या निमित्ताने ज्या आघाडया निर्माण झाल्या त्या नीतीभ्रष्ट तत्वहित होत्या. आंतरराष्ट्रीय प्रश्नाविषयी, जागतिक परिस्थितीविषयी कोणतेही भान नसणारे राजकीय पक्ष जी भूमिका बजावत आहेत. त्यातून या राजकीय पक्षाच्या हातात भारताचे भवितव्य सुरक्षित राहील असे वाटत नाही.

असे असले तरीसुध्दा भारतीयांची या सर्व घटनेमुळे आंतरराष्ट्रीय प्रश्नाविषयक जाणिव-जागृती वाढली. आतापर्यंत आंतरराष्ट्रीय राजकारण हे क्षेत्र सामान्य जनतेच्या दृष्टीने अनोळखी होते. काही ठराविक अभिजन वर्ग या क्षेत्रात निर्णय निर्धारण करीत असे. या प्रकरणामुळे भारतीय जनतेचे आंतरराष्ट्रीय

संबंधात निर्णय निर्धारण प्रक्रियेतील स्थान दिसून आले. भारतात जगातील सर्वात मोठी लोकशाही विनाखंड 60 वर्षे नांदत आहे. भारत दक्षिण आशियात लोकशाही व्यवस्थेचे नेतृत्व करीत आहे. दक्षिण आशियातील पाकिस्तान, बांग्लादेशमधील लोकशाही केवळ नावापुरतीच शिल्लक आहे. नेपाळ, अफगाणिस्तानमध्ये लोकशाही रूजू पाहत आहे. श्रीलंकेत अंतर्गत वांशिक संघर्ष आजही चालूच आहे. अशा परिस्थितीत भारतात लोकशाहीचा विकास सुरू आहे. स्वत:ला जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून स्वत:ला मिरवून घेणा ऱ्या भारतात राजकीय स्वार्थासाठी राजकीय पक्षाने जी भूमिका पार पाडली ती नक्कीच योग्य नाही.

संसद सदस्यांनी मतदान न करणे, लाच देणे, मतदानाला अनुपस्थित राहणे, अणुकरारासारख्या महत्वाच्या आंतरराष्ट्रीय प्रश्नाला जाणीवपूर्वक धार्मिक रंग देणे. विविध गुन्हयाखाली तुरूंगात असणा ऱ्या संसद सदस्यांना मतदानासाठी बाहेर काढणे हया घटनावरून भारतीय लोकशाहीतील नीती-मूल्ये सरळ पायदळी तुडवली आहेत. जगातील कोणत्याही लोकशाही व्यवस्थेत या गोष्टी समर्थन होऊच शकत नाही. भारतीय संसदेतील या घटना भारताच्या लोकशाही इतिहासातच नव्हे तर जगाच्या लोकशाही इतिहास कलंकित ठरल्या. भारत तिस ऱ्या जगातील लोकशाहीचे नेतृत्व करतो, त्यामुळे ही गोष्ट लाजीरवाणी आहे.

# संदर्भ सूची:-

1. COMMUNIST PARTY OF INDIA (MARXIST), COMMUNIST PARTY OF INDIA, REVOLUTIONARY SOCIALIST PARTY, ALL INDIA FORWARD BLOC, JULLY 2008, 'Left Stand on the Nuclear Deal.' Page No : 9.
2. कित्ता पृ.क्रमांक : 10-11.
3. भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) महाराष्ट्र राज्य कमिटीचे प्रकाशन, सप्टेंबर 2007. या देशघातकी भारत-अमेरिका आण्विक कराराला आमचा विरोध का? पृ.क्रमांक : 74.
4. सकाळ 5 सप्टेंबर 2007. पृ.क्रमांक : 2
5. आडवाणी लालकृष्ण 20 जूलै 2008. लोकमत मंथन पुरवणी पृ. क्रमांक : 3.
6. सकाळ 13 ऑक्टोंबर 2007 पृ.क्रमांक : 1.
7. कित्ता पृ.क्रमांक : 1.
8. लोकसत्ता 5 जूलै 2008 पृ.क्रमांक : 5.